ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार ६ मार्च, १९६८ | अंक ५



# वि वि ध मा हि ती

**गॅसचा अधिक पुरवठा**—गुजरात तेलशुद्धीच्या कारखान्यात पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात घरगुती जळणासाठी लागणाऱ्या गॅसचे उत्पादन होऊ लागणार आहे. तसे झाले म्हणजे इंडियन ऑइल कंपनी दोन महिन्यांच्या अवधीत अहमदाबाद शहराला हे इंधन पुरवू लागेल. सध्या रोज अवघ्या ४५० टाक्या गॅसने भरल्या जातात. पण त्या सर्व बडोदा शहरातच खपून जातात.

**कराच्या थकबाकीवर अधिक व्याज**—प्राप्तिकराची थकबाकी राहिल्यास त्यावर गेल्या ऑक्टोबरपर्यंत ६ टक्के व्याजाची आकारणी करण्यात येत असे. परंतु १ ऑक्टोबरपासून व्याजाची आकारणी ९ टक्क्याने करण्यात येऊ लागली आहे. कराची बाकी लवकर वसूल व्हावी म्हणून हा उपाय योजण्यात आला आहे. गेल्या सालअखेर थकबाकी ५५२ कोटी रुपये आहे.

**चांगल्या तांदुळाची निर्यात**—१९६२ सालापासून भारत उत्तम प्रतीच्या बासमती तांदुळाची दरसाल २ ते ५ हजार टनापर्यंत निर्यात करीत आहे. ह्या तांदुळाला परदेशात चांगली किंमत मिळते. निर्यातीने मिळणाऱ्या परदेशीय चलनाचा उपयोग करून जाडाभरडा तांदुळ आयात करण्यात येतो. त्याला किंमतही स्वस्त यावी लागते.

**कापडाच्या गिरणीसाठी सहकार्य**—हिंदमधील एका बड्या कंपनीने सीलोनमध्ये संयुक्त मालकीची एक कापड गिरणी स्थापन करण्याचे ठरविले आहे. ह्या गिरणीत सीलोनचे भांडवल ५१ टक्के असेल. गिरणीत एकूण ४ कोटी रुपये भांडवल गुंतविण्यात येणार आहे तीत दरसाल १·८ कोटी वार कापड तयार करण्यात येईल.

**कलकत्त्यात सर्वांत अधिक टेलिफोन**—महाराष्ट्र आणि पश्चिम बंगाल ह्यांत प्रत्येकी १,००,००० पेक्षा अधिक टेलिफोन आहेत—महाराष्ट्रात १,३३,८५३ आणि पश्चिम बंगालमध्ये १,१३,४७६. त्या खालोखाल मद्रास, संयुक्त प्रदेश आणि दिल्ली ह्यात प्रत्येकी ५०,००० पेक्षा अधिक टेलिफोन आहेत. शहरांपैकी कलकत्त्यात ९७,३९८, मुंबईत ९०,९४९, दिल्लीत ६१,२५६ आणि मद्रासमध्ये ३८,५९८ आहेत.

**कॉफीच्या निर्यातीत हिस्सा वाढला**—लंडन येथे भरलेल्या इंटरनॅशनल कॉफी कौन्सिलच्या बैठकीत भारताने करावयाच्या कॉफीच्या निर्यातीच्या हिश्यात वाढ करण्यात आली आहे. भारताला २५,३८० टन कॉफी निर्यात करण्याची परवानगी देण्यात आली आहे. कौन्सिलमध्ये करण्यात आलेल्या कराराची मुदत पाच वर्षांची असते. भारताच्या कॉफीच्या उत्पादनात २५० टक्के वाढ झाल्याने भारत अधिक प्रमाणात निर्यात करू शकतो.

**महाराष्ट्र सरकारचा हिंदीमधून पत्रव्यवहार**—महाराष्ट्र सरकार राजस्थान, गुजरात, बिहार आणि मध्यप्रदेश ह्या राज्यांशी हिंदीमधून पत्रव्यवहार करते; इतरांशी इंग्रजीमधून चालतो. मध्यवर्ती सरकारशी हिंदीमधून पत्रव्यवहार करण्यास महाराष्ट्र सरकारची हरकत नाही, पण त्या कामास पुरेसा नोकरवर्ग अद्याप शिकून तयार झालेला नाही.

**रिझर्व्ह बँकेकडील ओव्हरड्राफ्टः बिहार अग्रेसर**—एकूण पाच राज्यांनी रिझर्व्ह बँकेकडून ओव्हरड्राफ्ट घेतलेला आहे. त्यात बिहारचा ओव्हरड्राफ्ट सर्वात मोठा (२६·८६ कोटी रु.) आहे; राजस्थानचा १०·५३ कोटी रु., मध्यप्रदेशचा ८·७९ कोटी रु., ओरिसाचा ३·६२ कोटी रु. आणि मद्रासचा १·२१ कोटी रु. आहे.

**रेल्वेमार्ग बंद करणार**—रेल्वेखात्याने रामेश्वर ते धनुष्कोडी हा मार्ग बंद करण्याचे ठरविले आहे. १९६४ च्या डिसेंबरमध्ये भरतीच्या लाटांनी तो वाहून गेला होता. हा मार्ग पुन्हा चालू करण्यासाठी फार मोठा खर्च करावा लागेल आणि तो सुरक्षित राखण्यासाठी ७५ लाख रुपयांची बांधबंदिस्ती करावी लागेल.

**मोटारींतील परदेशी पोलाद**—भारतात तयार करण्यात येणाऱ्या प्रवासी मोटारगाड्यांच्या सांगाड्यासाठी लागणारे बहुतेक पोलाद परदेशांकडून आयात करावे लागते. रूरकेला पोलाद कारखान्याकडून फार थोड्या प्रमाणात अशा पोलादाचा पुरवठा होतो. ॲम्बेसेडॉर गाडीत २ हजारांचे, फियाट गाडीत १,५०० चे आणि स्टँडर्ड हेरॉल्ड गाडीत ८०० रुपयांचे परदेशी पोलाद वापरण्यात येते.

**अन्नधान्याच्या शिलकी साठ्यासाठी तरतूद**—अन्नधान्याच्या किंमती वाजवी पातळीवर रोखून धरण्यासाठी भारताचे अन्न महामंडळ शिलकी धान्याचा साठा करून ठेवीत आहे. जरूर तितक्या अन्नधान्याची खरेदी करता यावी म्हणून महामंडळाला १६५ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**लाइफ इं. कॉर्पोरेशनचे कोयनानगरसाठी कर्ज**—लाइफ इं. कॉर्पोरेशनने कोयनानगरच्या पुनर्बांधणीसाठी महाराष्ट्र सरकारला १ कोटी रु. कर्ज देऊ केले आहे.

**अनौरसांचे औरसीकरण**—देशातील अनौरस संततीला औरस बनविण्याची मेक्सिको सरकारने मोहीम सुरू केली आहे. तिला अनुसरून २८ फेब्रुवारी रोजी ८०० सामुदायिक विवाह लावून २,५०० मुलामुलींना आईबाप देण्यात आले.

**राजकीय पुढाऱ्यांची निवृत्ती ६५ व्या वर्षी**—न्यायाधीशांप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात यावे, असे आचार्य विनोबांनी सुचविले आहे.

**रशियन भाषेत विराटपर्व**—महाभारतातील विराटपर्वाचे रशियन भाषांतर मॉस्कोमध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# ★ अर्थ ★

बुधवार, ६ मार्च, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## आर्थिक मंदीतून बाहेर कसे पडावे ?

गेल्या वर्षापासून देशातील अर्थव्यवस्था मंदीच्या भोवऱ्यात सापडली आहे. ह्या घटनेची मीमांसा अनेक प्रकाराने व दृष्टिकोनाने करण्यात आली असून कोणत्या चुकांमुळे मंदी आली त्यासंबंधी फारसा वाद राहिलेला नाही. तथापि, मंदीतून बाहेर पडण्याच्या मार्गाबद्दल मात्र एकवाक्यता दिसून येत नाही. सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांनी अलीकडेच मुंबई येथील इंडियन मर्चंट्स चेंबर ह्या संघटनेपुढे बोलताना आर्थिक मंदीतून बाहेर पडण्याच्या उपायासंबंधी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. व्यापारधंद्यांत गुंतलेल्या लोकांना त्यांच्या भाषणातून एका नव्या दृष्टिकोनाची प्राप्ती होऊन विचारांना चालना मिळेल. श्री. टाटा ह्यांच्या मताने अर्थव्यवस्थेत काही नवीन वैशिष्ट्ये उत्पन्न झाली असून त्यांचा फायदा घेणाऱ्यांना भविष्यकालात फार मोठ्या संधी प्राप्त होणार आहेत. गेल्या ५ वर्षात शेती आणि उद्योगधंदे ह्यांच्यातील संबंधात बराच बदल घडून आलेला आहे. शेतीच्या मालाच्या किंमती ८१ टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर उद्योगधंद्यांतील मालाच्या किंमती अवघ्या २८ टक्क्यांनी वाढल्या आहेत. ह्याचा परिणाम म्हणून खेडोपाडी राहणाऱ्या लोकांच्या हाती अधिक पैसा खेळू लागला असून वस्तू खरेदी करण्याची त्यांची शक्ती वाढली आहे. ग्रामीण भागात पसरलेल्या ह्या लोकांपैकी १० टक्के लोक जरी उद्योगधंद्यात तयार होणाऱ्या मालाचे गिऱ्हाईक बनले तरी पक्क्या मालाच्या बाजारात सुमारे ५ कोटी नव्या गिऱ्हाइकांची भर पडेल. विस्तारलेल्या ह्या बाजारपेठेचा फायदा मात्र घेण्यात आला पाहिजे.

म्हणून उद्योगधंद्यांनी आपले बाजारपेठांसंबंधीचे धोरण नव्याने आखून ते ग्रामीण भागांशी अभिमुख केले पाहिजे. खेड्यांच्या गरजा लक्षात घेऊन उद्योगधंद्यांची दिशा बदलली पाहिजे. सध्याच्या आर्थिक मंदीच्या कारणांपैकी एक कारण असे आहे की उद्योगधंद्यांनी आपली मदार सरकारकडून येणाऱ्या व नागरी भागात राहणाऱ्या लोकांकडून येणाऱ्या मागणीवर मुख्यतः ठेवलेली होती. परंतु गेल्या काही महिन्यांत सरकारकडून येणारी मालाची मागणी घटली, शहरांतील लोकांची वस्तू खरेदी करण्याची शक्तीही घटली. कारण, त्यांच्यावर दुहेरी बोजा पडू लागला. एका बाजूने कराचा भार वाढत असतानाच अन्नावर होणारा खर्च वाढत्या किंमतीमुळे फुगत चालला. ह्याचा परिणाम होऊन मालाचा उठाव मंद झाला आणि व्यापार धंद्यांवर अवकळा येऊ लागली. व्यापारधंद्याने आता ग्रामीण भागांतील नव्या बाजार पेठांचा फायदा घेतला पाहिजे. तथापि असा फायदा घेता यावा म्हणून वाहतुकीचे रस्ते आणि अन्नपदार्थ साठविण्याच्या सोयी ह्या दोन्ही बाबतीत खूप सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. दुसरी एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामीण बाजारपेठेंत मुख्यतः रोज खपांच्या मालाची गरज भासणार आहे. सरकारी धोरणात आतापर्यंत ग्राहकांना नेहमी लागणाऱ्या वस्तू उत्पादन करणाऱ्या धंद्यांना प्राधान्य देण्यात आलेले नव्हते. आता अशा धंद्यांना सरकारी उत्तेजन देणे आवश्यक आहे. रोज खपाच्या वस्तूंची विक्री प्रचंड प्रमाणावर होत राहिल्यास सरकारला अबकारी करांच्या रूपाने अधिक उत्पन्न मिळत राहील. ज्या उद्योगधंदेवाल्यांना नव्या परिस्थितीचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनी बाजारपेठांचे संशोधन करून गिऱ्हाइकांच्या गरजा अजमावल्या पाहिजेत.

---

## बँक रेट ६% चा ५% : ठेवी आणि कर्ज ह्यांचे दरही कमी केले

मंदीवर उपाययोजना म्हणून रिझर्व्ह बँकेने कर्जपुरवठ्याच्या अटी थोड्या सैल केल्या होत्या. परंतु, हंगामात अपेक्षेप्रमाणे कर्जमागणी नाही. शेतीचे उत्पादनही वाढले आहे. तेव्हा, बँक रेट उतरविण्यास हरकत नाही, ह्या धोरणाने रिझर्व्ह बँकेने बँक रेट ६% चा ५% केला आहे. ठेवीवरील आणि कर्जावरील दर उतरविण्यास रिझर्व्ह बँकेने बँकांना आदेश दिला आहे. ९१ दिवसांच्या ट्रेझरी बिलांवरील व्याज ३.५% चे ३% करण्यात आले आहे. बँक रेट उतरविला असला, तरी सहकारी संस्थांना व्याजातील सवलत कायम राहणार आहे.

| ठेवींचे नवे दर | जुना दर % | नवा दर % |
|---|---|---|
| १५–४५ दिवस | १.५० | १.२५ |
| ४६–६० दिवस | ३.०० | २.५० |
| एक वर्ष | ६.०० | ५.५० |
| सेव्हिंग्ज ठेवी | ४.०० | ३.५० |

कर्जावरील व्याजाचा कमाल दर १०% वरून ९.५०% वर आणण्यात आला आहे.

## व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण

### श्री. एन्. दांडेकर यांचे भाषण

**श्री. एन्. दांडेकर यांचे 'व्यापारी बँकांवरील सामाजिक नियंत्रण' या विषयावर तारीख २४ फेब्रुवारी रोजी बृहद् महाराष्ट्र कॉमर्स कॉलिज, पुणे, मध्ये भाषण झाले.**

विषयाची सुरुवात करताना श्री. दांडेकर यांनी 'सामाजिक' या शब्दामागील गोंडस व फसवी भावना स्पष्ट केली. त्यानंतर व्यापारी बँकांच्या पद्धतीवर सर्वसामान्यपणे जे आक्षेप घेतले जातात त्यांचा त्यांनी ऊहापोह केला. व्यापारी बँका शेतीकरता यावी तितकी आर्थिक मदत देत नाहीत, असा एक आरोप व्यापारी बँकांवर नेहमी करण्यात येतो. वास्तविक भारतातील शेतीची प्रगती असमाधानकारक असण्याची कारणे वेगळी असून त्यामध्ये पर्जन्याच्या लहरीपणावर सर्वस्वी अवलंबून राहणे अगर आर्थिकदृष्ट्या किफायतशीर न होण्याइतकी लहान प्रमाणात केली जाणारी शेती या कारणांचा समावेश होतो. प्रचलित बँकिंग पद्धतीमध्ये कोणतेही फेरफार करून वरील मुलभूत समस्या सुटण्यासारख्या नाहीत.

दुसरा आरोप असा की, व्यापारी बँका लहान उद्योगधंद्यांना पुरेशी आर्थिक मदत करून उत्तेजन देत नाहीत. वास्तविक, लहान उद्योगधंद्यांना आर्थिक मदत करण्यासाठी एक विशिष्ट यंत्रणा अस्तित्वात आहेच. शिवाय जेथे लहान उद्योगधंदे आर्थिकदृष्ट्या मदत देण्यासारखे असतात तेथे व्यापारी बँका त्यांना मदत देतच आहेत. परंतु आर्थिकदृष्ट्या तग धरू न शकणाऱ्या उद्योगधंद्यांना मदत देण्याने व्यापारी बँकाच धोक्यात येतील.

ह्यानंतर त्यांनी तिसऱ्या आरोपाचा उल्लेख केला. हा आरोप असा की, प्रचलित बँकिंगपद्धत ही आपल्या योजनांमध्ये ध्वनित केलेल्या सामाजिक उद्दिष्टांशी जुळतेमिळते घेत नाही. या उद्दिष्टांमध्ये 'आर्थिक विषमता' नष्ट करणे, 'प्रादेशिक समतोलपणा' यांचा समावेश होतो. ही उद्दिष्टे म्हणजे शब्दांचे अवडंबर असून त्यामधून निश्चित कोणता अर्थ सूचित होतो हे सांगणे कठीण आहे असे त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे बँकांकडून ही उद्दिष्टे साध्य करून घेण्याची अपेक्षा करणे म्हणजे वस्तुविपर्यासच होय. सरकारने एकदा उद्योगधंदा सुरू करण्याचा परवाना दिल्यानंतर जर बँकेने अशा कारखानदाराला (आर्थिक मक्तेदारीला उत्तेजन मिळेल या भीतीने) आर्थिक मदत देण्याचे नाकारले तर ते हास्यास्पद होईल. त्यापेक्षा सरकारनेच उद्योगधंद्यांना परवाना देण्याचे धोरण योग्य प्रकारे आखल्यास औद्योगिक क्षेत्रातील मक्तेदारीस किंवा संपत्तीच्या केंद्रीकरणास आळा बसेल.

श्री. एन्. दांडेकर यांनी सरते शेवटी असे निक्षून सांगितले की आपल्या नियोजकांची या सर्व विषयात कोठेतरी गफलत होत असावी. बँकांच्या निश्चित कामगिरीची त्यांना कल्पना नसावी. बँका प्रामुख्याने ठेवीदारांच्या पैशावर पोसलेल्या असल्याने, ठेवीदारांना मानवेल असेच बँकेचे धोरण असले पाहिजे हे नाकबूल करता येणार नाही. वरील विधेयकांमध्ये 'बँकांचे धोरण' म्हणजे 'रिझर्व्ह बँकेने आखलेले कोणतेही धोरण' अशी कमालीची व्यापक व्याख्या केल्याने, बँकांच्या धोरणावर निश्चितपणे अनिष्ट परिणाम होणार आहे अशी स्पष्ट कल्पना त्यांनी दिली. तसेच अशा प्रकारचे विधेयक म्हणजे दुखण्यावरील रामबाण औषध नसून त्याऐवजी खऱ्या वस्तुस्थितीचे दुखणे नीट समजावून घेण्याचा योजकांनी जर प्रयत्न केला तरच आपली आर्थिक घडण सुरक्षित, सुव्यस्थित अशी राहील.

---

### अन्नधान्य विभाग रद्द करण्याचा प्रश्न

गतवर्षी सर्व भारतात कमी–अधिक प्रमाणात हवा तसा पाऊस झाला. त्यामुळे खरीप हंगामाची पिके चांगली आली आहेत. सरकारच्या अंदाजाप्रमाणे ९·५ कोटी टन अन्नधान्याची पैदास होईल तर व्यापारी वर्गाच्या अंदाजाप्रमाणे पैदास १० कोटी टनापर्यंत जाईल. ह्या परिस्थितींत अन्नधान्याचे विभाग रद्द करण्याचे सुचविण्यात येत आहे. पंजाबमध्ये व हरियाणामध्ये गव्हाचे व मक्याचे भरघोस पीक आले असून अन्नविभागाच्या बंदीमुळे त्यांच्या किंमती घटत आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. मध्यवर्ती सरकारने दिल्लीला धान्याच्या खुल्या बाजाराला परवानगी दिली आहे. हैद्राबाद शहरातही धान्याचा खुला बाजार सुरू करण्यात आला आहे. महाराष्ट्रातही पीकपाणी दोन वर्षानंतर चांगले आहे. अन्नधान्याचा खुला बाजार सुरू करावा अशी मागणीही करण्यात येत आहे. अन्नधान्याच्या किंमती वाजवी पातळीवर राखण्यासाठी शेतमाल किंमती मंडळाने ७० लाख टन धान्याचा साठा करून ठेवावा अशी सूचना केली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या मध्यापर्यंत अन्न महामंडळाला सुमारे २० लाख टन धान्यच गोळा करता आले आहे. अशा परिस्थितींत देशभर धान्याचा खुला बाजार सुरू केल्यास मंडळाला ७० लाख टनाचे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही. १९६८ साल पीकपाण्याच्या दृष्टीने कसे जाईल ते अद्याप समजावयाचे आहे. म्हणून काहीं राज्यांतील भरघोस पिकाला चांगला भाव मिळण्यासाठी अन्नधान्याचे विभाग घाईघाईने रद्द करण्यात येऊ नयेत असे नियोजन समितीचे आणि भारताच्या अर्थखात्याचे मत आहे. ह्या मतात अगदीच तथ्यांश नाही असे म्हणता येणार नाही.

---

### कच्छच्या लवादनिर्णयाला लष्करी महत्त्व नाही

आंतरराष्ट्रीय लवाद मंडळाने कच्छमधील जो ३१७ चौरस मैलांचा प्रदेश पाकिस्तानला देऊ केला आहे त्यापासून भारताला लष्करी धोका निर्माण होण्याचा संभव नाही असा लष्करी तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. ह्या भागाची रचनाच अशी आहे की त्याचा तळासारखा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर हल्ला करणे शक्य होणार नाही. काही मर्यादित स्वरूपाचे किरकोळ हल्ले मात्र करता येतील. सर्व कच्छच लष्करी हालचालींच्या दृष्टीने अतिशय प्रतिकूल असा भूभाग आहे. ह्या भागांत पाकिस्तानला एका तुकडीपेक्षा म्हणजे सुमारे १०–१५ हजार सैनिकांपेक्षा अधिक लष्कर आणतां येणार नाही आणि तेही कराचीहून आणावे लागेल. १९६५ साली झालेल्या संघर्षात पाकिस्तानला ह्या भागांत एक अगर दोन ब्रिगेडस लष्कर मोठ्या मुष्किलीने आणता आले. आतां कच्छच्या रणापर्यंत सरहद्दीवरील ठाणी अधिक बळकट करण्याचा प्रयत्न पाकिस्तान करील. त्यासाठी जरूर असणारी संधी लवादामुळे पाकिस्तानला मिळालेली आहे. १९६५ नंतर पाकिस्तानने आपले लष्करी बळ वाढविलेले आहे. तसेच ते भारतानेही वाढविलेले आहे. हिंदी व पाकिस्तानी लष्कराची कसोटी लागण्याचे ठिकाण कच्छचे रण हे नाही. पुन्हा तशी कसोटी लागण्याची वेळ आली तर ती पंजाब, राजस्थान, आणि काश्मीर मधील रणांगणावरच लागण्याचा संभव आहे. कच्छच्या रणातून हल्ला करावयाचे पाकिस्तानने पुन्हा ठरविल्यास प्रथमपासून हिंदी हद्दीत खोलवर घुसण्याच्या दृष्टीने कारवाई करावी लागेल. अशी कारवाई अयशस्वी ठरेल.

---

### पिकांवर पडणाऱ्या रोगराईचा बंदोबस्त

अशिया खंड जगातील मागासलेल्या प्रदेशापैकी एक फार मोठा प्रदेश आहे. जपानसारखा देश सोडला तर अजूनही आशियातील बहुसंख्य लोकांचे योगक्षेमाचे साधन शेती हेच आहे. अनुकूल हवामान व हुकमी पाणीपुरवठा अशा सारख्या सोयी असल्या तरीही शेतीच्या उत्पादनाला रोगराईची बाधा होण्याचा संभव असतो. अलीकडे प्रगत देशात झालेल्या संशोधनामुळे पिकावरील कीड व रोगराई नाहीशी करण्याची रसायने निघाली आहेत. त्यांचा प्रभाव भारताप्रमाणेच इतर आशियायी देशांत हळूहळू वाढत चालला आहे. मुंबई येथे एका रासायनिक औषधाच्या कंपनीने आशिया परिषद् भरविली होती. परिषदेत असे सांगण्यात आले की आशियातील बहुतेक शेतकरी दरिद्री असल्यामुळे त्यांच्याजवळ पिकांचे संरक्षण करणारी रसायने फवारण्यासाठी लागणारा पैसा नसतो. त्यामुळे अर्थातच त्यांची कुचंबणा होते. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हा फक्त भारतातच दिसतो असे नाही. आशिया खंडातील इतर अनेक देशांतही हीच परिस्थिती दिसून येते. पिकांचे संरक्षण करणाऱ्या औषधांच्या किंमतींचा विचार करताना त्यापासून होणारा फायदा मुद्दाम लक्षात घेण्यात आला पाहिजे. पिकांवर पडणाऱ्या रोगराईचा प्रतिकार करण्यात न आल्याने कित्येक हजार कोटी रुपयांचे पीक नष्ट होते. त्यामुळे अन्नाची गरज आणि त्याचा पुरवठा ह्यांच्यातील फरक अधिकच उग्र स्वरूप धारण करतो. म्हणून कीडनाशक व रोगप्रतिबंधक रसायनांच्या निर्मितीकडे आणि त्यांच्या वितरणाकडे अधिक लक्ष देण्यात आले पाहिजे. असे लक्ष दिल्यास अन्नाची टंचाई कमी होण्यास चांगली मदत होईल.

---

### अमेरिका व पश्चिम युरोप ह्यांच्यांत व्यापारी युद्धाचा संभव

संयुक्त राष्ट्र संघटनेने पुरस्कार केलेली आंतरराष्ट्रीय व्यापार आणि विकास परिषद दिल्ली येथे चालू असताच अमेरिका आणि युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी ह्या गटांतील ६ देश ह्यांच्यांत व्यापारी युद्ध सुरू होण्याचा संभव निर्माण झाला आहे. इटली हा देश टोमॅटो हवाबंद डब्यांत भरून ते अमेरिकेला निर्यात करतो. अशा प्रकारे स्पेन आणि पोर्तुगाल हे देशही अमेरिकेला टोमॅटोची निर्यात करतात. परंतु त्यांचे टोमॅटो स्वस्त असतात. त्या देशांच्या स्पर्धेला तोंड देता यावे म्हणून इटालिअन सरकारने आपल्या ह्या उद्योगधंद्याला आर्थिक मदत दिलेली आहे. त्याचा परिणाम अमेरिकेमधील टोमॅटो पिकविणाऱ्या शेतकऱ्यांवर झाला आहे. इटलीमधून आयात करण्यात येणाऱ्या डबाबंद टोमॅटोवर जरूर तितकी जकात बसविण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. अमेरिकेला निर्यात करण्यात येणाऱ्या शेतमालाला संबंधित देश किती व कशी मदत करतात ह्याची आता चौकशी करण्यात येत आहे. चौकशी पूर्ण झाल्यावर अमेरिकेने काही कृती करण्याचे ठरविल्यास ती फक्त टोमॅटोच्या आयातीपुरतीच मर्यादित राहील असे नाही. टोमॅटोबरोबरच डुकराचे मास, भाजी, वनस्पति तेले, इत्यादी अन्नपदार्थांवरही जकात बसविण्यात येण्याची शक्यता आहे. अमेरिकेने असे काही धोरण स्वीकारले तर त्यात बेकायदा काही आहे असे म्हणता येणार नाही. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धीला हातभार लावण्याच्या नेहमी करण्यात येणाऱ्या आवाहनाशी ते जुळणार नाही. खुद्द युरोपिअन इकॉनॉमिक कम्युनिटी मधील देशही उक्ती आणि कृती ह्यांच्या सुसंगततेची काळजी करीत नाहीत. कारण हे देशही आयातीवर जबर जकाती बसवून आपापल्या देशाच्या हिताची जपणूक करीत असतातच.

---

### जपानी कामगारांची कामासंबंधीची वृत्ती

एशिअन प्रॉडक्टिव्हिटी ऑर्गनायझेशन ह्या संघटनेचे दोन उत्पादनतज्ज्ञ भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. भारताच्या राष्ट्रीय उत्पादकता मंडळाचे बंगलोर विभागाचे संचालक श्री. रामचंद्रन् ह्यांनी स्थानिक उद्योगधंद्यांशी संबंधित असलेल्या लोकांची व त्यांची ओळख करून दिली. ह्या मेळाव्यात जपानी तज्ज्ञांनी जपानमधील कामगारासंबंधी उद्बोधक माहिती दिली. ते म्हणाले की जपानमधील कामगार रोजगारीत मिळणारे वेतन हेच सर्वस्व मानीत नाहीत. अपार कष्ट करून उत्पादन वाढविले तरच स्वतःची व देशाची उन्नति होईल हे त्याला पटलेले आहे. त्यामुळे काम कसून करण्याच्या वृत्तीचा तो बनलेला आहे. जपानममधील कामगार हा सर्वसाधारणपणे चांगला प्रशिक्षित असतो. त्यामुळे कार्यक्षमता आणि उत्पादकता ह्या बाबतीत तो वरच्या प्रतीचा असतो. शिवाय जपानी कामगाराला प्रशिक्षित करणे सोपे आहे. कारण जपानमध्ये एकच भाषा आहे. जपानमधील कामगार आता चैनीच्या राहणीकडे झुकू लागला आहे. प्रमाणित उत्पादनापेक्षा जास्ती उत्पादन केल्यास त्याला आकर्षक दराने रोजगार मिळतो. जपानमधील कारखानदार आपला धंदा सुरू करण्यापूर्वी त्यासंबंधीची सर्व बारीकसारीक माहिती मिळवितो. अर्थात कारखाना सुरू झाल्यावर तो कार्यक्षमतेने चालण्याची खात्री असते. कारखाना चालविण्यात कामगारांना भागीदार करण्याची पद्धत जपानमध्ये नाही. परंतु उत्पादनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कामगारप्रतिनिधींशी विचारविनिमय केला जातो. एका उद्योगधंद्यात कामगारांच्या सूचनांमुळे दोन लाख येनचा अधिक नफा झाला.

---

### दंतवैद्यांनाही काम मिळतेच असे नाही

डेंटल कॉन्सिल ऑफ इंडिया ह्या संघटनेचे अधिवेशन दिल्ली येथे भरविण्यात आले होते. संघटनेच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणात दंतवैद्यक व्यवसायाविषयी माहिती देऊन असे सांगितले की हिंदमध्ये अनेक लोकांना वैद्यकीय मदतीची गरज असताना पुष्कळ कुशल दंतवैद्यांना पुरेसे काम मिळत नाही. हिंदमधील दंतवैद्यांची संख्या अवघी ७,००० आहे. सुमारे ७५ हजार माणसांमागे १ दंतवैद्य असे प्रमाण पडते. दर ३० हजार माणसांमागे १ दंतवैद्य असण्याची गरज आहे. हे प्रमाण पडण्यासाठी अजून निदान १५ हजार दंतवैद्यांची आवश्यकता आहे. देशात दातांचे दवाखाने अवघे ३,००० च्या आसपास आहेत. ५० कोटी लोकसंख्येच्या मानाने ते अत्यल्पच म्हटले पाहिजेत. दरसाल सुमारे ३०० पदवीधर दंतवैद्य तयार होतात. पण, त्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. दंतवैद्यांपैकी २५ टक्के ग्रामीण भागात व्यवसाय करतात.

तारेचा पत्ता "मॉर्गेज"
मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र. २५६५२७

मुंबई राज्य सहकारी
भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

वी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले,
व्यवस्थापक

ये. स. बोरगांवकर
कार्यकारी संचालक

सन १९६७ मध्ये
ठेवीत १५ टक्के वाढ

वसूल भांडवल : रु. १२·८४ लाख
राखीव निधी : रु. ९·३२ लाख
ठेवी रु. ६८२·७३ लाख
गुंतवणूक : रु. २०६·३४ लाख
कर्जव्यवहार : रु. ३७६·४३ लाख

शाखा २९

दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.

( स्थापना–१९३६ )
मुख्य कचेरी–सातारा

## रुमेनिआकडून तेलजन्य पदार्थांची आयात

इंडिअन ऑईल कॉर्पोरेशन आणि रुमेनिअन सरकारच्या मालकीची तेल निर्यात करणारी कंपनी ह्यांच्यांत एक करार करण्यात आला आहे. करारातील अटींस अनुसरून १९६७ साली भारत रुमेनियाकडून ७५ हजार टन तेल आयात करणार आहे. औद्योगिक उत्पादनाची ठरविलेली उद्दिष्टे गांठण्यासाठी भारताला वंगणाच्या तेलाची अतिशय गरज आहे. हा करार झाल्यामुळे भारताच्या परदेशीय चलनातील खर्चात जवळजवळ चार कोटी रुपयांची बचत होईल. १९७१-७२ साली देशाला ८ लाख टन वंगणाच्या तेलाची गरज लागेल असा अंदाज आहे. भारत सरकार आणि एसो कंपनी ह्यांच्या सहकार्याने उभारलेल्या कारखान्यांत दरसाल १ लाख, ४५ हजार टन तेल निर्माण करण्यात येईल. त्यापैकी निम्मे तेल इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनला देण्यात येईल. सार्वजनिक मालकीच्या विभागात तेलाच्या उत्पादनाचे कारखाने उभारण्याच्या कामी रुमेनिआने भारताला बरीच मदत केलेली आहे. आसाममध्ये एक आणि बिहारमध्ये एक अशा दोन सार्वजनिक मालकीच्या तेल कंपन्या उभारण्यासाठी रुमेनिआने तांत्रिक सहकार्य दिलेले आहे. अशा सहकार्याशिवाय हे कारखाने स्थापन करणे शक्य झाले नसते. तेल आणि तेलजन्य पदार्थांच्या निर्मितीच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचे भारताचे प्रयत्न चालू आहेत. अलीकडे कांही तेलजन्य पदार्थांच्या निर्यातीस प्रारंभ करण्यात आला आहे. आशिआतील काही देशांना भारत ह्या पदार्थांची निर्यात करूं लागलेला आहे. तेलजन्य पदार्थांच्या निर्यातीमुळे भारताला ह्या वर्षी सहा कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले.

---

## १७ लाख टन खताची आयात

हिंदमधील शेतीचे उत्पादन वाढविण्याच्या धोरणास अनुसरून भारत सरकार पुढील वर्षी १७ लाख टन खताची आयात करणार आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर खताची आयात करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. आयातीसाठी २२० कोटी रुपये खर्ची पडणार आहेत. गेल्या वर्षी १३ लाख टन खताची आयात करण्यात आली होती. दर एकरी अधिक पिके देणाऱ्या बियाणाची लागवड अधिकाधिक जमिनीत करण्याचा कार्यक्रम पार पडण्यासाठी खताची आयात अपरिहार्य झाली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ३.२५ कोटी एकरांत सुधारलेल्या बियाणाची लागवड करण्यात येणार आहे.

---

## इनकम टॅक्सची थकबाकी ५५२ कोटी रु.

डिसेंबर, १९६७ अखेर इनकम टॅक्सची थकबाकी ५५२ कोटी रु. आहे.

---

## आर्थिक मंदी तरुण उद्योगपतींना उपकारक ?

अखिल भारतीय बँक असोसिएशनचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध उद्योगपति श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनी अमरावती येथे केलेल्या भाषणात चालू आर्थिक मंदीविषयी चाकारीबाहेरचे विचार व्यक्त केले आहेत. आर्थिक मंदीचे अग्निदिव्य तरुण व्यापाऱ्यांना व उद्योगपतींना उपकारकच ठरेल असा अभिप्राय व्यक्त करून ते पुढे म्हणाले की सरकारने ज्याप्रमाणे अविचारी आर्थिक कार्यक्रम आखले त्याचप्रमाणे तरुण उद्योगपतीही मोठमोठ्या औद्योगिक संघटना स्थापन करण्याचे अंगावर घेतात. वयस्कर उद्योगपतींनी त्यांना लगाम घालण्याचे प्रयत्न केले तर ते रागावतात. उद्योगधंद्यात आशावादी जरूर असले पाहिजे; पण आशावादाला सावधपणाची जोडही असली पाहिजे. अलीकडे पसरलेल्या मंदीमुळे उद्योगधंद्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. १९६० मध्ये उत्पादन-वाढीची गति ११ टक्के होती, ती १९६७ सालात २.५ टक्क्यापर्यंत खाली घसरली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर विचार करता ही पुच्छप्रगतीच म्हणावी लागेल. मंदीविरुद्ध फारच अल्प उपायांची योजना करण्यात आली आहे, आणि ते उपायही पूर्णांशाने अंमलात आणण्यात आले नाहीत. आर्थिक मंदी एका दृष्टीने उपकारकच म्हटली पाहिजे. तीमुळे आर्थिक कार्यक्रमांच्या भव्यतेचा बुडबुडा फुटला आहे. त्याचप्रमाणे मंदीमुळे अर्थव्यवस्थेत शेतीचे किती महत्त्व आहे ते सर्वांच्याच चांगले लक्षात आले आहे. म्हणून आता शेतीच्या विकासाला अग्रहक्क देण्यांत येत आहे. हिंदमधील पक्क्या मालासाठी परदेशी बाजारपेठा हुडकण्याच्या प्रयत्नालाही मंदीमुळे प्रेरणा मिळाली आहे. अंतर्गत बाजारपेठेत स्पर्धा होऊ लागून मालाचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न आता होतील.

---

## मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक

(आकडे कोटी रुपयांचे)

| | १९६७-६८ दुरुस्त अंदाज | १९६८-६९ अंदाज |
|---|---|---|
| महसुली जमा | २५७१.९० | २७२८.४९ |
| महसुली खर्च | २४८४.८१ | २६२२.५७ |
| भांडवली जमा | १७२७.६९ | १६५६.९७ |
| भांडवली खर्च | २११४.७८ | २०७७.८९ |
| एकूण जमा | ४२९९.५९ | ४३८५.४६ |
| एकूण खर्च | ४५९९.५९ | ४७००.४६ |
| एकूण तूट | ३००.०० | ३१५.०० |
| करवाढीनंतर तूट | ........ | २९९.०० |

## खतकारखान्यांना प्रशिक्षित कामगारांचा तुटवडा


अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा वापर वाढू लागला असून ह्यापुढेही काही काल तो वाढतच जाणार आहे. खतांचे कारखाने देशातच काढण्यात येत आहेत. त्यांचे उत्पादन अपुरे असल्याने परदेशातूनही खतांची आयात करण्यात येणार आहे. परंतु देशातील खत कारखान्यांपुढे एक निराळीच अडचण उपस्थित झाली आहे. खत कारखान्यांना लागणारा प्रशिक्षित नोकरवर्ग पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. त्यामुळे कारखान्यांच्या उत्पादनक्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेणे अवघड होत आहे. कारखान्यांसाठी लागणारे कुशल कामगार शिकवून तयार करण्याच्या ज्या सोयी उपलब्ध आहेत त्या अपुऱ्या पडत आहेत. ह्या परिस्थितीची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासारखी आहे. खत कारखान्यांची उभारणी करण्यात येत असताना अनेक बिगरकसबी माणसे कामावर घेण्यात आली. कारखान्यात उत्पादन सुरू झाल्यावर त्यांचा कितपत उपयोग होईल ह्यासंबंधी विचार करण्यात आला नाही. अर्थात त्यांच्या लायकीचा प्रश्नच उपस्थित झाला नाही. कारखाने उभारून झाल्यावर ह्यांपैकी बरीच माणसे कायम स्वरुपाच्या जागांवर घेण्यात आली. परंतु त्यांच्यावर सोपविलेले काम करण्याची त्यांची पात्रता होतीच असे मात्र नाही. अशा माणसांपैकी बरीच माणसे नंतर शिकून लायक होतात, नाही असे नाही. परंतु त्यांना काही विवक्षित विभागातच काम करण्याचे जमते. कारखान्याच्या उत्पादनात आपले स्थान कोणते ह्याची त्यांना कल्पना नसते. त्यांचे वेतनही फारसे आकर्षक नसते, किंवा त्यात फारशी वाढ होण्याची शक्यताही नसते. परिणामी अशा कामगारात असंतोष फैलावू लागतो आणि कारखान्यात अस्वस्थता निर्माण होते.

---

## आर्थिक फायद्यासाठी राजकारणाचा विसर ?

हिंदुस्थानची फाळणी होऊन पाकिस्तान व भारत अस्तित्वात आल्यापासून उभयता देशात तेढीचे व शत्रुत्वाचे वातावरण निर्माण झाले. १९६५ च्या पाकिस्तानच्या आक्रमणापासून उभयतांचे संबंध अधिकच बिघडले परंतु माणसांप्रमाणेच देशही अखेर अर्थाचे दास असतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठात भारत व पाकिस्तान हे दोन्ही देश ताग आणि तागाच्या वस्तू ह्यांची निर्यात करतात. निर्यातीमुळे दोघांनाही आवश्यक परदेशीय चलनाची प्राप्ती होते. तागाच्या किंमतीच्या बाबतीत परस्परांशी स्पर्धा केल्या तर उभयता देशांना तोटा सहन करावा लागतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन तागाची किंमत किफायतशीर पातळीवर ठेवण्यासाठी उभयता देश एकमेकांची चाचपणी करीत आहेत. उघड करार न झाला तरी किंमती वाजवी ठेवण्यासाठी अलिखित प्रथात पडण्याची शक्यता आहे.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्ट
कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"

फोन
नं. १६९



उत्पादक —
भिडे ॲन्ड सन्स. प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## चालू आणि नवे पोस्टाचे व तारेचे दर

| | | चालू दर | नवा दर |
|---|---|---|---|
| १ पाकिटे | १५ ग्रॅम्स | १५ पैसे | २० पैसे |
| | पुढील प्रत्येक १५ ग्रॅम्स | १० पैसे | १५ पैसे |
| २ पोष्टकार्डे | सिंगल | ६ पैसे | १० पैसे |
| | जोडकार्डे | १२ पैसे | २० पैसे |
| ३ लेटरकार्डे | | १० पैसे | १५ पैसे |
| ४ बुकपोष्ट | ५० ग्रॅम्स | १० पैसे | १५ पैसे |
| | पुढील प्रत्येक २५ ग्रॅम्स | ५ पैसे | १० पैसे |
| ५ फक्त पुस्तकांचे | प्रत्येक ५० ग्रॅम्स | ५ पैसे | |
| बुकपोष्ट | १०० ग्रॅम्सपर्यंत | | १० पैसे |
| | पुढील प्रत्येक ५० ग्रॅम्स | | ५ पैसे |
| ६ वृत्तपत्रे | ६० ग्रॅम्स | २ पैसे | |
| | १०० ग्रॅम्स | | ५ पैसे |
| ७ पार्सले | ४०० ग्रॅम्स | ६५ पैसे | ८० पैसे |
| ८ रजिस्ट्रेशन | | ६० पैसे | ७० पैसे |
| ९ पावती फी | | १० पैसे | १५ पैसे |
| १० सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंग | | ५ पैसे | १० पैसे |
| ११ म. ऑर्डर कमिशन प्रत्येक १० रु. | | १५ पैसे | |
| | प्रत्येक १० रु., २०० रु. पर्यंत | | २० पैसे |
| | यापुढे प्रत्येक २० रु. स | | २० पैसे |
| १२ एक्स्प्रेस डिलिव्हरी फी | | १५ पैसे | २० पैसे |
| १३ लेट फी | | १० पैसे | १५ पैसे |

**तारा**

| | ऑर्डि. | एक्सप्रेस | ऑर्डि. | एक्सप्रेस |
|---|---|---|---|---|
| साध्या–पहिले ८ शब्द | १·०० | २·०० | १·२० | २·४० |
| पुढील प्रत्येक शब्द | ०·१० | ०·२० | ०·१० | ०·२० |
| ग्रीटिंग्ज–८ शब्द | ०·८० | १·६० | १·०० | २·०० |
| पुढील प्रत्येक शब्द | ०·१० | ०·२० | ·१० | ०·२० |

---

## फौजदारी गुन्ह्याबद्दल कैद, तरी मंत्री

श्री. जसराज हे सरकारी नोकरीत असताना लाचलुचपतीबद्दल त्यांना १८ महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. हायकोर्टानेहि ती कायम केली होती. श्री. जसराज ह्यांना सरकारी नोकरीतून काढून टाकण्यात आले होते. परंतु त्यामुळे ते विधान सभेचे सभासद होण्यास अपात्र ठरत नाहीत, असे राजस्थानच्या मुख्य मंत्र्यांनी सांगितले. श्री. जसराज पार्लमेंटरी सेक्रेटरी आहेत.

## रेल्वे नोकरांचे १८ कोटी रु. चे मोफत पास

रेल्वेज् दरवर्षी आपल्या सनदी नोकरांना सहा मोफत फॅमिली पासेस आणि सहा मोफत तिकिटांचे सेट देते. खालच्या दर्जाच्या नोकरांना तीन मोफत फॅमिली पासेस आणि सहा मोफत तिकिटांचे सेट देते. ह्याउलट, इतर खात्यांतील सरकारी नोकरांना दोन वर्षांतून फक्त एकदाच प्रवासाची सवलत मिळते; ही सवलतहि ४०० किलोमीटरपेक्षा लांब प्रवास करणारांनाच मिळते. सेवानिवृत्तीनंतरहि रेल्वेमधील नोकरांना फुकट प्रवासाचे पास दिले जातात. एस्टिमेटस कमिटीच्या हिशोबाप्रमाणे ह्या मोफत पासेसमुळे १७·८९ कोटी रु. चे उत्पन्न बुडते, पण रेल्वे खात्याने स्वतः त्याबद्दल काहीच हिशेब ठेवलेला नाही. इतके फुकट पास देण्याचे कारण नाही; त्यात खूप मोठी कपात केली पाहिजे, असे कमिटीने सांगितले आहे.

---

## १६ वर्षांच्या मुलावर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया

पश्चिम बंगालमधील एका सरकारी आरोग्यकेंद्रात १६ वर्षांच्या मुलावर संततिप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याला घेऊन येणाऱ्या प्रचारकाने त्याचे वय ३३ वर्षांचे असून तो विवाहित असून चार अपत्यांचा बाप असल्याचे लिहून दिले होते. त्याने मुलाला ३ रुपये दिले आणि स्वतः सरकारी नियमाप्रमाणे १२ रुपये घेतले. शस्त्रक्रिया करणाऱ्या ह्या डॉक्टराला अशी शस्त्रक्रिया करण्याची बंदी करण्यात आली आहे. मुलाचे 'रीकॅनलायझेशन' मोफत करण्यात यावे, असा सरकारने हुकूम दिला आहे.

---

## २०४ चर्चेस बांधण्यासाठी अमेरिकेतून काळया बाजाराचे मार्गे ८ लक्ष रुपये आणले

कोट्टायम (मद्रास) येथील एका पाद्र्याने आपल्या भाषणात, आपण आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यात केरळमध्ये २०४ चर्चेस बांधण्यासाठी इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेसकडून ८ लक्ष रुपयांची देणगी मिळविली, त्याचा उल्लेख केला. ही रक्कम त्याने काळ्याबाजाराच्या मार्गे, जास्त हुंडणावळीच्या दराने, भारतात आणली. त्याचा एनफोर्समेंट डिरेक्टोरेटला सुगावा लागून, त्याने त्यापैकी २·३ लक्ष रुपये हस्तगत केले आहेत.

---

## स्त्री–स्पर्धकाचे सुवर्णपदक काढून घेतले

इंटरनॅशनल ॲमेच्युर ॲथलेटिक्स फेडरेशन कौन्सिलने कु. इवा क्लोबुकोवास्का ह्या पोलिश स्पर्धकाची जागतिक सुवर्णपदके काढून घेतली आहेत, कारण ती लिंग निश्चित करणाऱ्या डॉक्टरी तपासणीत नापास झाली आहे. तिला स्त्री म्हणता येणार नाही असा तज्ज्ञ डॉक्टर मंडळाचा अभिप्राय पडला. तिने काही वर्षांपूर्वी मिळविलेली पदके काढून घेणे अन्यायाचे आहे; त्या वेळेच्या परीक्षेत ती स्त्री ठरली नसती कशावरून, असा प्रश्न विचारला जात आहे.

### हत्ती पकडण्यात म्हैसूर सरकारला तोटा

जंगली हत्ती पकडण्याच्या 'खेडा' मोहिमेत म्हैसूर सरकारला ४ लाख रुपये तोटा सहन करावा लागला आहे. म्हैसूर सरकारने ही मोहीम पूर्ण करण्यासाठी ८ लाख रुपये खर्च केले होते. जंगली हत्तींना पकडण्याची ही मोहीम पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांकडून सुमारे १.५ लाख रुपये तिकिटविक्रीच्या रूपाने मिळाले. पकड मोहिमेत ८२ हत्ती पकडण्यात आले. पण, त्यातील ४० अगदीच पिसाळलेले निघाल्यामुळे त्यांना परत जंगलांत सोडून देण्यात आले. म्हैसूरच्या प्राणिसंग्रहालयाने २० हत्ती घेतले आहेत. उरलेले हत्ती विकून सरकारला २.५ लाख रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे.

### बिहारमधील विजेची चोरी

बिहार इलेक्ट्रिसिटी बोर्डाची दरसाल १० कोटी युनिट्स वीज चोरून वापरली जाते, अशी माहिती संबंधित मंत्र्याने दिली आहे.

### हिंदी-विरोधी दंगलीमुळे रेल्वेजचे नुकसान

दक्षिण भारतात हिंदी-विरोधी जी दंगल झाली, तीमुळे फेब्रुवारी, १९६५ ते सप्टेंबर, १९६७ ह्या मुदतीत रेल्वेजचे ५७ लक्ष रुपयांचे नुकसान झाले. ६३ रेल्वे स्टेशनांना आगी लावण्यात आल्या. बंगाल बंद आणि आंध्र प्रदेशातील पोलाद कारखान्याबाबत आंदोलन ह्यामुळे रेल्वेजचे ९० लक्ष रुपयांचे नुकसान झाले. बऱ्याच आगगाड्या बंद ठेवाव्या लागल्यामुळे १.५३ कोटी रुपयांचे उत्पन्न बुडाले.

**मनिऑर्डरीचा व्यवहार पोस्ट खात्यास तोट्याचा—** प्रत्येक मनिऑर्डरचे पोटी पोस्ट खात्याला १.०८ रु. खर्च येतो आणि सरासरी मिळकत ८२ पैसे असते. त्यामुळे मनिऑर्डरीचे पोटी खात्याला दरसाल २ कोटी रु. नुकसान येते. मनिऑर्डरींच्या कमिशनमध्ये सुचविलेली वाढ हे नुकसान भरून काढू शकणारी नाही.

**९२,००० टन साखरेची निर्गत—** चालू वर्षी भारत ९२,००० टन साखरेची निर्गत करील. ही निर्गत मुख्यतः अमेरिका आणि ग्रेटब्रिटनकडे होईल.

**पोस्टकार्डाचा व्यवहार पोस्ट खात्यास तोट्याचा—** प्रत्येक पोस्ट कार्डाचे पोटी पोस्ट खात्याला १०.७३ पैसे खर्च येतो, पण मिळतात मात्र ६ पैसे. त्यामुळे खात्याला दरसाल सुमारे ६ कोटी रु. नुकसान होते.

**संरक्षणाचा खर्च वाढत चालला—**१९६१ साली संरक्षण खात्याचा खर्च ३१२ कोटी रु. होता, तो १९६२-६३ साली ४७२ कोटी रु., १९६३-६४ साली ८१६ कोटी रु., १९६४-६५ साली ८०५ कोटी रु., १९६५-६६ साली ८८८ कोटी रु. आणि १९६६-६७ साली ९१८ कोटी रु. झाला. १९६८-६९ मध्ये १,०१५ कोटी रु. खर्चाची तरतूद आहे.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.

**अधिक धान्योत्पादन!**
**अधिक फायदा!!**
**अधिक बचत!!!**


यांसाठी

किर्लोस्कर

**डिझेल एंजिन्स**

यांचीच निवड आवश्यक आहे...

कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिनें, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यांस उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यांस लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानानें फारच कमी येतो.



**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड.**

रजि. ऑफिस-एल्फिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.